


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०३ ● अंक : ०१७ ● पुणे ● सोमवार, दि. २९ सप्टेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




# आपल्या पोरांनी मॅच काढली

## आशिया कपवर विजयाचा 'तिलक' : फायनलमध्ये पाकिस्तानला लोळवत जिंकली 'ट्रॉफी'



● **विजय खेचून आणण्यात दुबे-सॅमसन-तिलकला यश**

**दुबई (दै. आरंभ पर्व)** तिलक वर्मा (53 चेंडूंत नाबाद 69), शिवम दुबे (22 चेंडूंत 33) व संजू सॅमसन (24) यांनी निर्णायक टप्प्यात चढवलेल्या जोरदार हल्ल्यात पाकिस्तानचा संघ नेस्तनाबूत झाला आणि भारताने पाकच्या जबड्यातून अक्षरश: विजय खेचून आणत आशिया चषक जेतेपदावर अगदी थाटामाटात शिक्कामोर्तब केले! भारताने अगदी शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या या रोमांचक लढतीत प्रारंभी पाकिस्तानला 1 बाद 113 वरून सर्वबाद 146 धावांवर रोखले तर प्रत्युत्तरात19.4 षटकांत 5 बाद 150 धावांसह सनसनाटी विजय संपादन केला.

विजयासाठी शेवटच्या 3 षटकांत 30 धावांची आवश्यकता असताना भारताने 18 व्या षटकात 13 धावा वसूल केल्या तर 19 व्या षटकात आणखी 7 धावांची भर घातली. निर्णायक शेवटच्या षटकात 10 धावांची आवश्यकता असताना तिलक वर्माने पहिल्या 3 चेंडूंत 9 धावा वसूल करत विजयाचे दरवाजे उघडले तर रिंकूने दमदार चौकार फटकावत पाकिस्तानच्या आशा-अपेक्षांना शेवटचा सुरुंग लावला. या लढतीत विजयासाठी 147 धावांचे आव्हान असताना अभिषेक शर्मा (5) प्रारंभीच बेजबाबदार फटका मारत बाद झाल्याने भारताला पहिला झटका बसला.

अगदी पहिल्या चेंडूपासूनच उत्तुंग फटकेबाजी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या अभिषेकने फहीम अश्रफच्या गोलंदाजीवर रौफकडे सोपा झेल दिला. आऊटसाईड ऑफ स्टम्पवरील त्या चेंडूवर अभिषेक नेहमीच्या स्टाईलने उत्तुंग षटकार मारण्याच्या पवित्र्यात होता. मात्र, यादरम्यान त्याचा अंदाज सपशेल चुकला आणि पाकला पहिले यश मिळाले.

या स्पर्धेत फारशा बहरात नसलेल्या सूर्यकुमार यादवने (1) या निर्णायक लढतीत देखील निराशा केली. त्याने शाहिनच्या गोलंदाजीवर आगाकडे झेल दिला. आगाने पुढे डाईव्ह मारत झेल टिपत सूर्याची खेळी संपुष्टात आणली. यानंतर शुभमन गिल तिसऱ्या षटकात धावचीत होता होता वाचला.

पण, या जीवदानाचा त्याला अजिबात लाभ घेता आला नाही. उलटपक्षी, त्याने लवकरच अतिशय बेजबाबदार फटका मारत आपली विकेट गमावली आणि भारताला आणखी एक धक्का बसला. फहीम अश्रफच्या कटरवर गिलने मिडऑनच्या दिशेने आततायी फटका मारल्यानंतर रौफने हवेत झेपावून अप्रतिम झेल टिपला. आघाडी फळीतील तिन्ही फलंदाज अतिशय स्वस्तात गारद झाल्यानंतर तिलक वर्मा व संजू सॅमसन यांनी डाव सावरत पाकिस्तानवर हळूहळू दडपण आणले आणि नंतर विजयही खेचून आणण्यात सिंहाचा वाटा उचलला.

### खेचून आणला विजयाचा घास!

**विजयासाठी 147 धावांची गरज असताना भारताची एकवेळ 3 बाद 20 अशी दाणादाण उडाली असताना याचवेळी संजू सॅमसन व तिलक वर्मा ही जोडी मैदानावर जमली आणि या उभयतांनी चौथ्या गड्यासाठी 57 धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी साकारली. सॅमसननंतर 13 व्या षटकात बाद झाला, त्यावेळी भारताची 4 बाद 77 अशी स्थिती होती. यानंतर तिलकने सर्व सूत्रे हाताशी घेत 53 चेंडूंत 69 धावांची आतषबाजी केली आणि 'नापाक' पाकचे विजयाचे इरादे अक्षरश: धुळीस मिळवले. दुबेची 22 चेंडूंतील 33 धावांची तडाखेबंद खेळीदेखील तितकीच लक्षवेधी ठरली!**

### फरहानची अक्कलही ठिकाण्यावर

**यापूर्वी, अर्धशतक झळकावल्यानंतर गनफायर सेलिब्रेशन करत मुजोरी दाखवणाऱ्या साहेबजादा फरहानची अक्कल या निर्णायक सामन्यात मात्र ठिकाणावर आल्याचे दिसून आले. फरहानने येथे अर्धशतक झळकावल्यानंतर केवळ बॅट हातात वर घेत आपल्या सेलिब्रेशनवर लगाम घातला.**

### पहिल्या ४ षटकांतच ३ बळी, तरीही...

**विजयासाठी 147 धावांचे आव्हान असताना भारताने पहिली 4 षटके पूर्ण होण्यापूर्वीच अभिषेक शर्मा, सूर्यकुमार यादव व शुभमन गिल असे 3 बिनीचे मोहरे गमावले आणि यामुळे भारताची प्रारंभीच 3 बाद 20 अशी दैना उडाली होती. पण, नंतर तिलक, सॅमसन व दुबेने पलटवार केल्यानंतर भारताला आशिया चषकातील नवव्या जेतेपदावर शिक्कामोर्तब करता आले.**




### भरधाव एसटी बस खड्ड्यात; अपघात टळला



**कडुस (दै. आरंभ पर्व) :** कडुस-कोहिंडे बुद्रुक रस्त्यावर कडूस गावाजवळील पाझर तलावा जवळील घाट उतारावर भरधाव येणाऱ्या एसटी बस (एमएच १४ बीटी ४७१९) चालकाचे नियंत्रण सुटल्याने एस टी बस वेगात जाऊन बाजूच्या चारीत खड्ड्यात गेली. प्रवाशी, विद्यार्थींना आपत्कालिन मार्ग तसेच चालकाच्या बाजूचा दरवाजा उघडून बाहेर काढण्यात आले. मुक्कामी खरपूर गावावरून आलेली एसटी बस होती. या एसटी बसमध्ये सुमारे ४३ प्रवासी होते. यामध्ये विद्यार्थी व वृद्ध नागरिक होते. एसटी बसचा वेग इतका होता समोरून आलेल्या एसटी बस चालकाने शिताफिने आपली एसटी बस बाजूला घेतली;अन्यथा समोरासमोर दोन एसटी बसचा अपघात झाला असता; मात्र सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नाही.











# वेडाचे बळी

तामिळनाडू या राज्यातील अभिनेते साक्षात ईश्वर समजले जातात आणि क्रिकेटमध्ये सचिन तेंडूलकरला जे स्थान आहे तेच तेथील लोकप्रिय अभिनेत्यांना असते. डेमी गॉड्स असे हे अभिनेते समजले जातात, दक्षिणेत या चित्रपट अभिनेत्यांची मंदिरे उभारली गेली आहेत. इतक्या पराकोटीचे वेड तेथे आहे. त्यामुळे विजय थलपती या अभिनेत्याच्या रॅलीत काल करूर येथे घडलेल्या चेगराचेंगरीची घटना दुःखदायक असली तरीही आश्चर्यकारक मुळीच नाही. अभिनेते विजय यांच्या रॅलीत झालेल्या गर्दी आणि चेंगराचेंगरीमुळे ३९ लोक ठार झाले, तर कित्येक लोक जखमी झाले. मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी मृतांच्या नातेवाइकांना मदत वगैरे जाहीर केली आणि या घटनेची चौकशी होणार आहे. पण तामिळनाडूतील लोकांचे वेड कमी होत नाही. यापूर्वीही कित्येक अभिनेते आणि अभिनेत्री यांनी तेथे लोकांना वेड लावले आहे आणि त्यात अनेक लोकाचे प्राण गेले आहेत. तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री दिवंगत एमजी रामचंद्रन, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री राहिलेले एन. टी. आर, जयललिता आणि सध्या राजकीय पक्ष काढून राजकारणात स्वतःचा धाक जमवण्याच्या प्रयत्नात असलेले कमल हसन असे किती तरी नेते आहेत ज्यांनी राज्यावर आधी अभिनयाने आणि नंतर राजकारणात जाऊन राज्य केले आहे. त्यांच्यामागे हजारो लोक असतात आणि त्याच्यासाठी ते प्राणही त्यागण्यास तयार असतात. एखाद्या नेत्याचे निधन होते तेव्हा त्यांच्यामागे कित्येकांनी आत्महत्या केल्याची उदाहरणं आहेत. हे पराकोटीचे वेड लोकांना त्यांच्या आत्मघातामागे घेऊन जाते असे दिसते. विजय थलपती हा दक्षिणेतील सर्वाधिक मानधन घेणारा स्टार आहे. रजनीकांत आणि धनुष हे असेच सर्वाधिक मानधन घेणारे कलाकार आहेत. जितके हे स्टार लोकप्रिय होतात तितकेच त्यांचे फॅन फॉलोईंग वाढत जाते आणि मग त्यांना नुसतं पाहण्यासाठी हे लोक काहीही करण्यास तयार होतात. हेच विजय यांच्या रॅलीत घडले. करूर या जिल्ह्यात विजय येणार होते. पण त्यांना यायला उशीर झाला. उशीर झाल्याने लोक अगोदरच त्रस्त झाले होते आणि त्यात पुरेशी व्यवस्थाही नव्हती. त्यामुळे लोकांनी विजयला पाहण्यासाठी खेचाखेच केली आणि तेथे झालेल्या अभूतपूर्व चेंगराचेंगरीत ३९ लोक ठार झाले.

या घटनेने तमिळ लोकांचे चित्रपट अभिनेत्यांबद्दल असलेले वेड आणि तेथील राजकारण यांचे सरमिसळ कशी केली जाते याचे विदारक चित्र ही घटना दर्शवते. विजय यांचा पक्ष अजून बाल्यावस्थेत आहे पण त्यांच्या चाहत्यांच्या गर्दीने विजय यांना ब्लॉक बस्टर चित्रपटाचे अनाकलनीय आणि कल्पनातीत असे भावनात्मक वलय प्राप्त करून दिले आहे. विजय यांच्या रॅलीत जमलेली गर्दी ही राजकीय गर्दी नव्हती हे पहिल्या प्रथम लक्षात घेतले पाहिजे. विजय यांच्या चाहत्यांची गर्दी ही टिपिकल पक्ष कार्यकर्त्यांची नव्हती, तर ती सिनेमा वेडाने पछाडलेली होती हा इतर मेळाव्यातील आणि या गर्दीतील फरक आहे. दाक्षिणात्य चित्रपट सृष्टीतील अभिनेत्यांचे वेड कसे पराकोटीला गेले आहे हे याच घटनेवरून लक्षात येते आणि यापूर्वीच्या कित्येक घटनांवरूनही लक्षात येतेच. आणखी एक दाक्षिणात्य अभिनेत्री आहे जिचे नाव आहे खुशबू. दक्षिणेत तिचे मंदिर उभारले आहे. विजय यांना प्रचंड उशीर झाला तरीही त्यांचे चाहते थांबले होते आणि नंतर त्यांनी विजय यांना पाहण्यासाठी भयानक गर्दी केली असे प्रत्यक्ष फुटेज सांगतात. त्यातच एकोणचाळीस लोकांचा बळी गेला. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. ज्या तीव्रतेने विजयचे चाहते त्यांना पाहण्यासाठी आले होते ते केवळ दक्षिणेतच पाहायला मिळते. तामिळनाडूत विजय यांचा थेट सामना द्रमुकशी आहे. त्यामुळे जमलेल्या गर्दीत विजय यांचे चाहते अधिक संख्येने होते तसेच द्रमुकचे प्रेमी असण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा थेट सामना कोण अधिक लोकप्रिय असा होता. विजय यांच्याकडे फॅन फॉलोईंग आहे तसेच त्यांच्याकडे पक्षाची विचारधारा आहे पण प्रशासनाने हा मेळावा हाताळण्यात अक्षम्य ढिलाई केली हे खरे आहे. कारण प्रशासनाने विजय यांच्या मेळाव्यासाठी गर्दी आटोक्यात आण्यासाठी तितके प्रयत्न केले नाहीत. विजय यांनी प्रशासनाला माहिती दिली होती, की फक्त १० हजार प्रशंसक येतील. पण प्रत्यक्षात त्यापेक्षा चारपट अिधक लोक हजर होते.



विजय यांच्या चाहत्यांना ज्या अडचणींचा सामना करावा लागला त्यामुळे लोकांचा संताप होणे साहजिक होते. पण डिजिटल युगात विजय यांच्या चाहत्यांच्या प्रचंड संख्येने जमणे आणि लोकांनी त्यांचे भाषण ऐकणे आणि त्यात झालेल्या गर्दी आणि चेंगराचेंगरीत प्राण गमावणे हे अभूतपूर्व आहे. विजय यांचा चाहता वर्ग आज सर्वत्र वाढत आहे कारण त्यांना कमल हसन आणि चिरंजीवी वगळता फारसे प्रतिस्पर्धी उरलेले नाहीत. त्यामुळे विजय यांच्या रॅलीत दुर्घटना घडण्यामागे द्रमुक प्रशासन, पोलीस आणि न्यायालयाची असहाय्यता हीच कारणं आहे असे लक्षात येते. विजय यांची अपेक्षा होती त्यापेक्षा अधिक लोक जमले. इतक्या अफाट लोकसंख्येचे व्यवस्थापन करण्यात तामिळनाडू प्रशासन अपयशी ठरले हे सत्य आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून काय उपाय करता येतील याचा विचार आता केला जाईल, कारण ही काही पहिलीच घटना नाही आणि अखेरची तर नाहीच. बंगळूरुमध्ये आरसीबी चाहत्यांनी अशीच गर्दी केली होती आणि त्यात ११ चाहत्यांचा मृत्यू ओढवला होता. तेव्हाही हेच प्रश्न उपस्थित झाले होते. आता सर्वांनी सजग राहून उपाय करण्याची वेळ आली आहे.

# ही लढाई जनतेच्या विश्वासाची, प्रभागाच्या विकासासाठी : मोरे

## भूपेंद्र मोरे यांची कार्यकर्त्यांसमवेत बैठक



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीला सुरुवात झाली असून सामाजिक कार्यकर्ते श्री.भूपेंद्र मोरे यांनी मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांची बैठक घेतली. या बैठकीत निवडणुकीसाठीची रणनीती, कार्यकर्त्यांची जबाबदारी, ज्येष्ठांचे मार्गदर्शन आणि महिलाभगिनींचा पाठिंबा या सर्व बाबींवर चर्चा झाली.

"आजवर मी तुमच्यासाठी शक्य ते प्रयत्न केले. आता प्रभागाच्या विकासासाठी आपण सारे एकत्र यायला हवे. ही लढाई केवळ राजकारणाची नाही, तर जनतेच्या विश्वासाची आहे. असंख्य प्रेम करणाऱ्या माझ्या सर्व स्तरातील नागरिकांना मी आश्वस्त करतो की, आपण ही लढाई नक्कीच जिंकणार आहोत." असे बोलत सर्वांना भावनिक आवाहन केले.

त्यांनी पुढे स्पष्ट केले की, "आपला उद्देश केवळ प्रभागाचा सर्वांगीण विकास आहे. रस्ते, पाणी, स्वच्छता, आरोग्य या मूलभूत सोयीसुविधा प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण झटणार आहोत. पण यासाठी तुमच्या सहकार्याची आणि एकतेची गरज आहे." शेतकऱ्याच्या मुलाला नगरसेवक करण्याची संधी तुम्हाला आली आहे ती निश्चितपणे तुम्ही पूर्ण करावी.. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी उपस्थित नागरिकांनी मोरे यांच्या कार्याचे कौतुक व्यक्त केले. आगामी निवडणुकीत तुमच्या पाठीशी राहणार असल्याचा निर्धार अनेक नागरिकांनीही बोलून दाखवला.

बैठकीनंतर कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जा आणि आत्मविश्वास दिसून आला. नागरिकांच्या पाठिंब्यावर आणि सहकाऱ्यांच्या मेहनतीवर विश्वास ठेवून भूपेंद्र मोरे यांनी विजयाचा ध्यास घेतल्याचे स्पष्ट दिसत होते. प्रभागाच्या विकासासाठी आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपण सारे एकत्र आलो, तर विजय नक्की आहे, असा ठाम विश्वास ह्या बैठकीनिमित्त कार्यकर्त्यांमध्ये दृढ झाला.

श्री.भूपेंद्र मोरे यांनी ही बैठक घेऊन एक प्रकारे निवडणुकीचे रणशिंग फुंकल्याचे ह्या निम्मित पाहायला मिळाले.

यावेळी भूषण मोरे,राजाभाऊ जाधव, विठ्ठल सूर्यवंशी, हरीश वैद्य, लतिफ शेख, प्रशिक दारुंडे, सुनील पढेर, सुशील भागवत, सुरज दांगडे, सोनाली नायर, यांच्यासह विविध कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### भीमा नदीच्या पुरात चारचाकी मोटार बुडाली; मोटारचालकाचा बुडून मृत्यू

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) : खेड तालुक्यात सुरु असलेल्या धुवांधार कोसळणाऱ्या पावसामुळे नदीला आलेल्या पुरात चारचाकी मोटार बुडाली असून मोटारचालकाचा बुडून मृत्यू झाला. ज्ञानेश्वर कोबल (रा. मोहकल ता. खेड) असे मृत मोटारचालकाचे नाव आहे. हि दुर्घटना चास व टोकेवाडी यांना जोडणाऱ्या भीमानदीच्या पुलावर घडली. रविवारी (दि. २८) संध्याकाळी ही घटना घडली. अशी माहीती खेड पोलीसांनी दिली. खेड तालुक्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर वाढला असून चासकमान धरणातून सुमारे ३० हजार क्युसेक्स वेगाने पाणी भीमानदी पात्रात सोडण्यात आले होते. त्यामुळे नदीला पूर आला होता. चास-टोकेवाडी येथे नदी दुथडी भरून वाहत होती. तसेच पुलावरील संरक्षक दगडावरून पाणी वाहत होते. अशा वेळी जीवघेणे धाडस करून कोबल यांनी त्यांची चारचाकी वॅगनर मोटार (क्र.एम. एच. १४, ई.यू. ३४४१) ही पुलावरून चालवत नेली. परंतु पाण्याच्या जोरदार प्रवाहाने मोटार नदीपात्रात ओढली गेली. व पाण्यात बुडाली. या घटनेत कोबल यांचा दुर्देवी मृत्यू झाला. पोलीसांनी मदतकार्य सुरू करून, पाण्याचा प्रवाह काहीसा कमी झाल्यावर ट्रॅक्टरच्या सहाय्याने मोटार बाहेर काढण्यात आली.**

# पीएमआरडीएच्या १९ सेवा ऑनलाइन

- **पुणेकरांना घरबसल्या मिळणार सुविधा**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमानुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) २९ सेवांपैकी १९ सेवा ऑनलाइन देण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांना आता या सेवा घरबसल्या मिळणार आहेत. येत्या काही दिवसांत उर्वरित सेवा देखील ऑनलाइन करण्यात येणार असून त्यांची प्रकिया सुरू करण्यात आली असल्याचे प्राधिकरणाकडून सांगण्यात आले. प्राधिकरणाने सुरू केलेल्या या ऑनलाइन सेवांची माहिती अर्जदारांनी आपल्या ऑनलाइन अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर कळविणार आहे.

# कर्मवीर भाऊराव पाटील जयंती व बाबुरावशेठ मते पुण्यस्मरनानिमित्त कार्यक्रम

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक व शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३८व्या जयंतीनिमित्त तसेच कै. बाबुरावशेठ मते पुण्यस्मरण दिनानिमित्त यशवंत विद्यालयात २७ सप्टेंबर रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या गणित–विज्ञान साहित्य, रांगोळी, हस्तकला व चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सौ. अनुजा सुशांत पाटील यांनी भूषविले. प्रमुख वक्ते श्री. बी. एस. जाधव तर रयत शिक्षण संस्थेचे पश्चिम विभागीय अधिकारी श्री. संजय मोहिते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार फडतरे यांनी प्रास्ताविक करताना उपक्रमांचा आलेख मांडला व देणगीदारांचे आभार मानले.




प्रमुख वक्ते जाधव सरांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य विद्यार्थ्यांसमोर उलगडले. तर श्री. मोहिते यांनी विद्यालयातील उपक्रमांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान अध्यक्षा व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी स्कूल कमिटी सदस्य विलास मते, अशोक मते, विजय मते, पै.राहुल मते, संजय मते, सौरभ मते, दिवाकर मते, सुनील मते, दत्ताभाऊ कोल्हे, अनिल मते, सुरेश मते, तुळशीदास मते, उमेश गोऱ्हे, आनंद मते, सागर कोल्हे, सोपान मते, मंजूताई मते, बाळासाहेब गोगावले आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांनी सहभाग घेतला.

सूत्रसंचालन सौ. शितल चौरे यांनी केले तर आभारप्रदर्शन सौ. वैशाली येवले यांनी मानले.

# नवरात्रोत्सव हा समाजाला प्रेरणा देणारा उपक्रम - अखिलेश मिश्रा

- **अखिल मित्र मंडळ नवरात्र उत्सवाला प्रचंड प्रतिसाद :**
- **२००६ पासून मंडळाने जोपासली आध्यात्मिक परंपरा**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवरात्र हा भारतीय संस्कृतीतील अत्यंत पवित्र आणि उत्साहपूर्ण सण आहे. शक्तीची उपासना, धर्मपरंपरेचे पालन आणि भक्तीभावाची एकात्मता या सणातून प्रकट होते. नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची आराधना केली जाते. उपवास, जागरण, आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून या काळात समाज एकत्र येतो. त्यामुळे नवरात्र हा केवळ धार्मिक सण न राहता, तो अध्यात्मिक ऊर्जा देणारा आणि समाजाला प्रेरणा देणारा महोत्सव ठरत असल्याचे प्रतिपादन अखिल मित्र मंडळ नवरात्रोत्सवाचे संस्थापक अखिलेश मिश्रा यांनी केले.

पुणे शहरातील बी.टी.कवडे रोड येथील अखिल मित्र मंडळाच्या नवरात्रोत्सवात देवीची आरती आणि विविध उपक्रमांच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे औचित्य साधून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी नगरसेवक बाबू वागस्कर आणि भारतीय जनता पार्टीच्या (आठवले गट) माजी नगरसेविका हिमालीताई कांबळे यांच्या शुभहस्ते देवीची आरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविकांसाठी बिहार विरूद्ध उत्तरप्रदेश कृष्णलीला जुगलबंदी या आध्यात्मिक जुगलबंदीचे सादरीकरण करण्यात आले. हे पाहून उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. शिवाय, मंडळाच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रगल्भतेचे तोंडभरून कौतुक केले. सन २००६ पासून मंडळाने सामाजिक बांधिलकी व आध्यात्मिक परंपरा जोपासून आपली वाटचाल यशस्वीपणे पूर्ण केली आहे.

नवरात्रोत्सव हा केवळ उपक्रम नसून, समाजाला एकत्र आणणारा पूल आहे. विविध जाती, धर्म, पंथ आणि सर्व वयोगटातील लोक एकत्र नाचताना सामाजिक सलोखा आणि ऐक्याची भावना वृद्धिंगत होते. ग्रामीण भागापासून ते शहरी महानगरांपर्यंत सर्वच स्तरातील लोक या परंपरेत सहभागी होतात. शिवाय, नवरात्राच्या कार्यक्रमांमध्ये सामाजिक उपक्रम, , जनजागृती मोहीम किंवा सामाजिक समस्यांवर भाष्यही केले जाते. यामुळे नवरात्रोत्सव हा सामाजिक जागृतीचे परिपूर्ण व सक्षम व्यासपीठ ठरते, असे मत भारतीय जनता पार्टीच्या माजी नगरसेविका हिमालीताई कांबळे यांनी व्यक्त केले.



नवरात्रोत्सवात समाजातील एकोपा, परंपरा आणि सामूहिक आनंदाचा अनोखा संगम दिसतो. देवीच्या आराधनेसोबतच गरबा-दांडिया सारखे नृत्यप्रकार, भजने आणि कीर्तन यांमुळे गावागावांतून उत्साहाची लाट उसळते. स्त्रीशक्ती, धैर्य आणि न्यायाच्या विचारांना प्रोत्साहन देणारा हा उत्सव लोकांना अंधश्रद्धेपेक्षा मूल्यांचा आणि सद्गुणांचा विचार करण्यास भाग पाडतो. नवरात्रोत्सव हा उत्साह, श्रद्धा आणि सामाजिक ऐक्य यांचा सुंदर संगम असल्याचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी नगरसेवक बाबू वागस्कर यांनी सांगितले.

# यशवंत कारखान्याची ४२वी वार्षिक सभा गोंधळात संपन्न

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याची 42वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी पुन्हा एकदा गोंधळात पार पडली. वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रकांसह सहा विषय संचालक मंडळाने अभूतपूर्व गोंधळात आवाजी मतदानाने मंजूर करून घेतले. काही माजी संचालक व त्यांच्या समर्थकांनी आक्षेप नोंदवण्याचा प्रयत्न केला, मात्र सभासदांनी चर्चा न वाढवता मंडळाला पाठिंबा दिला. त्यामुळे अखेर सभा गोंधळातच संपन्न झाली.

ही सभा कारखान्याचे अध्यक्ष सुभाष जगताप यांच्या अध्यक्षतेखाली कोलवडी मांजरी खुर्द येथील लक्ष्मी गार्डन येथे झाली. जगताप यांनी सुरुवातीला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाने दिलेल्या जमिनीच्या विक्री परवानगीबद्दल आभार मानले. तसेच कारखान्याचे नामकरण "श्री चिंतामणी यशवंत सहकारी साखर कारखाना मर्यादित" असे झाल्याची माहिती दिली.

कार्यकारी संचालक कैलास झरे यांनी विषय पत्रिका व मागील वृत्तांत वाचून दाखवल्यानंतर विकास लंवाडे यांनी आक्षेप घेतला. त्यांनी 2012-13 चे प्रोसिडिंग कालबाह्य असल्याचे सांगून कारखान्याच्या जमिनीच्या विक्रीत गडबड झाल्याचा आरोप केला. कमी किमतीत जमीन विक्री करून कारखाना व सभासदांना तोट्यात घातले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सभेत गोंधळ वाढताच कार्यकारी संचालकांनी सर्व विषयांवर मतदानासाठी विचारणा केली. उपस्थित सभासदांनी 'ठराव मंजूर' अशा घोषणा देत सहाही ठराव मंजूर केले. सभेला हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप, उपसभापती शशिकांत गायकवाड, संचालक प्रशांत काळभोर, कारखान्याचे उपाध्यक्ष किशोर उंद्रे यांच्यासह अनेक मान्यवर व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजेंद्र रतन चौधरी यांनी संचालक मंडळाने कठीण प्रश्नांना उत्तरे देणे टाळून घाईघाईत ठराव मंजूर केल्याचा आरोप केला. त्यांनी नफा-तोटा पत्रकातील अनेक विसंगती व ताळेबंदातील अपूर्ण माहिती अधोरेखित करत, "संचालक मंडळाने सभेतून पळ काढला," अशी टीका केली.

## मंजूर विषय

- **सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकारणे**
- **सन २०२६-२७ साठी भांडवल उभारणीस संचालक मंडळास अधिकार देणे**
- **३१ मार्च २०२५अखेरच्या वर्षातील लेखापरीक्षण अहवाल नोंदविणे**
- **सन २०२५-२६ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व शुल्क ठरविणे**
- **अंतर्गत लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व शुल्क ठरविणे**

# पूरग्रस्तांसाठी बापूसाहेब पोकळे पाटील यांचा ३५० कुटुंबांना एक हात मदतीचा

## आ. भीमराव तापकीर, धीरज घाटे यांच्याकडून बापूसाहेब पोकळे यांचे कौतुक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठवाडा व सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले. अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले, शेतकरी हवालदिल झाले, घरदार पाण्यात वाहून गेले. शेकडो कुटुंब बेघर झाली आहेत. संपूर्ण महाराष्ट्रभर या आपत्तीबद्दल हळहळ व्यक्त होत आहे.

अशा काळात, समाजाप्रती जबाबदारी ओळखत धायरीतील युवा नेते व खडकवासला विधानसभा भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे पाटील यांनी पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे.



**३५० कुटुंबांना जीवनावश्यक**

**साहित्याचा आधार :** बापूसाहेब पोकळे पाटील यांनी स्वतः पुढाकार घेऊन किराणा साहित्य व जीवनावश्यक वस्तूंच्या तब्बल 350 किट्स तयार केल्या. या किट्समध्ये दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा समावेश असून, ही मदत पूरग्रस्तांना दिलासा ठरणार आहे. हे किट्स त्यांनी शहराध्यक्ष धीरजजी घाटे यांच्याकडे सुपूर्द केली आहे.

पुढील आठवड्यातही बापूसाहेब पोकळे हे आणखी ३००किट व नागरिकांनी स्वइच्छेने दिलेली मदत व प्रत्यक्ष पूरग्रस्तांमध्ये जाऊन बापूसाहेब पोकळे स्वतः या साहित्याचे वाटप करणार आहेत.

**मान्यवरांचे विशेष कौतुक :** या उपक्रमावेळी उपस्थित मान्यवरांनी बापूसाहेब पोकळे यांच्या सामाजिक जाणिवेचे मनापासून कौतुक केले. "संकट काळात मदतीसाठी धावून जाणे हेच खरे समाजकारण आहे", असे प्रतिपादन मान्यवरांनी केले.

खडकवासल्याचे आमदार आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.

यावेळी शहराध्यक्ष धीरजजी घाटे,शहर सरचिटणीस रवींद्रजी साळेगावकर,मंडल अध्यक्ष रुपेशजी घुले,मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे,प्रभाग अध्यक्ष पै.तुषार पोकळे,उद्योजक ऋषिकेश पोकळे,दादासाहेब भुरुक,विशाल कोंढाळकर,सागर पोकळे,महेंद्र कडू, टंबरिन पार्क सांस्कृतिक संस्था सभासद यावेळी उपस्थित होते.

**समाजकारण म्हणजे केवळ राजकारण करणे नसून, कठीण प्रसंगी लोकांसोबत उभे राहणे हाच खरा धर्म आहे, हे बापूसाहेब पोकळे पाटील यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले.**






दैनिक **आरंभपर्व**

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

सोमवार, दि. २९ सप्टेंबर २०२५









# नऱ्हे-धायरी-वडगाव परिसरातील खड्डे आठ दिवसांत बुजवा

## अन्यथा पुणे महानगरपालिकेमध्ये "शिमगा" होणार : सामाजिक कार्यकर्ते श्री. भूपेंद्र मोरे यांचा पुणे महानगरपालिकेवर शिमगा आंदोलनाचा इशारा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे, धायरी, वडगाव व आंबेगाव परिसरातील रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिकांचे हाल होत असून, या गंभीर समस्येकडे पुणे महानगरपालिकेने तात्काळ लक्ष द्यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसचे खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे कार्याध्यक्ष श्री. भूपेंद्र मुरलीधर मोरे यांनी केली आहे.

मोरे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, "५ ऑक्टोबरपर्यंत खड्डे बुजवले नाहीत, तर पुणे महानगरपालिकेत घुसून शिमगा आंदोलन करण्यात येईल."



ते म्हणाले, "महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेल्या डांबर प्लांटवर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे. कारण सध्या रस्त्यावर टाकले जाणारे डांबर अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून, ते फक्त अस्ताव्यस्त पसरवले जाते. त्यामुळे काही दिवसांतच रस्ते पुन्हा खड्डेमय होतात. नागरिकांच्या पैशांचा आणि वेळेचा सरळ सरळ अपव्यय केला जात आहे."

मोरे यांनी प्रशासनाला विनंती केली की, "जसजसा पाऊस ओसरेल तसे तात्काळ खड्डे दर्जेदार पद्धतीने व टिकाऊ डांबर वापरून बुजावेत. फक्त ठिगळ लावण्याच्या कामावर पैसे खर्च करण्यापेक्षा दर्जेदार आणि दीर्घकाळ टिकणारे रस्ते तयार करणे हीच खरी जबाबदारी आहे."

रस्त्यावरील खड्ड्याच्या श्रेय वादापेक्षा दर्जेदार रस्ते होणे गरजेचे असल्याचे मत श्री.भूपेंद्र मोरे यांनी यावेळी व्यक्त केले.

**स्थानिक नागरिकांनीही या इशाऱ्याला पाठिंबा दिला असून, रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांना प्रशासन जबाबदार धरले जाईल, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. आता नागरिकांचे लक्ष ५ ऑक्टोबरपर्यंत रस्त्यांची खड्डेमुक्ती होणार की शिमगा आंदोलन पेट घेणार, याकडे लागले आहे.**






# आंबेगाव-जुन्नरला मुसळधार पावसाचा तडाखा

**घोडेगाव (दै. आरंभ पर्व)**

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम भागात भीमाशंकर, आहुपे व पाटण खोऱ्यात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे घोड नदी व बुब्रा नदीला मोठा पूर आला आहे. आदिवासी भागातील जनजीवन विस्कळित झाले असून, अनेक पूल पाण्याखाली गेले आहेत. तालुक्यात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे डिंभे, घोडेगाव, मंचर, कळंब या मंडल विभागांत आकडेवारीनुसार अतिवृष्टी झाल्याची माहिती तहसीलदार संजय नागटिळक यांनी दिली. आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम व घोडेगाव परिसरात शनिवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस पडत आहे. डिंभे धरणातून ३५ हजार क्यूसेकने पाणी सोडल्यामुळे घोड नदीला मोठा पूर आला आहे. गोहे येथील पाझर तलाव पूर्ण क्षमतेने भरून वाहत आहे. त्यामुळे व इतरही ओढ्यांना मोठे पूर आल्यामुळे नदी पात्राच्या बाहेर पाणी गेले आहे. शिनोली, गंगापूर, घोडेगाव कोळदरे, चिंचोली, नारोडी, वडगाव काशिंबेग, चांडोली, एकलहरे येथील स्मशानभूमीमध्ये पाणी घुसले आहे. नदीकाठच्या पिकाला मोठा फटका बसला असून ही पिके जमीन दोस्त झाली आहे. घोड नदीवरील सर्व बंधाऱ्यांच्या वरून पाणी वाहत असल्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. घोडेगाव व चिंचोली दरम्यान असणारा सर्वात मोठा पूल पाण्याखाली गेल्यामुळे जुन्नर- घोडेगाव रस्त्यावरील वाहतूक बंद केली आहे.

# खडकवाडीत आयुष्मान भारत नोंदणी अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सुरु असलेल्या सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने दिनांक २८ सप्टेंबर रोजी खडकवाडीत आयुष्मान भारत योजनेच्या नोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचे मार्गदर्शन आमदार भीमराव अण्णा तापकीर व भाजपा युवा मोर्चा पुणे जिल्हा अध्यक्ष वैभवजी सोलनकर यांनी केले. तर आयोजनाचा पुढाकार युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष परशुराम बाळासाहेब तागुंदे यांनी घेतला.

गावातील जेष्ठ नागरिकांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी भाजपा खडकवासला ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे,माजी पंचायत समिती सदस्या राखीताई तागुंदे, माजी सरपंच सुरेश बाप्पू तागुंदे, विद्यमान सरपंच दत्तात्रय बोडके, उपसरपंच सौ. संगीता तागुंदे, आदी मान्यवर उपस्थित होते.



या अभियानाला खडकवाडी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत शस्त्रक्रिया व उपचार मिळण्याची तरतूद असल्याने या योजनेचा लाभ नागरिकांना मोठ्या प्रमाणात होणार आहे.

भविष्यात ग्रामीण युवकांसाठी शैक्षणिक व व्यावसायिक उपक्रम तसेच जेष्ठ नागरिकांसाठी आरोग्यसेवा प्रकल्प राबविले जाणार असल्याचे परशुराम तागुंदे यांनी सांगितले. या उपक्रमामुळे सेवा पंधरवड्यात समाजोपयोगी कार्याचा विधायक संदेश दिला गेला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अवैध दारू व गुटखा विक्री थांबवण्याची नागेश चव्हाण यांची मागणी

बार्शी (आरंभ पर्व) : बार्शी तालुक्यातील ज्योतिबाचीवाडी व हत्तींज परिसरात गेल्या काही महिन्यांपासून अवैध दारू व गुटखा विक्रीचा गोरखधंदा सुरू असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या अवैध धंद्यामुळे तरुणाई व्यसनाधीन होत असून महिलांचे संसार उद्ध्वस्त होणे, कौटुंबिक वाद, हिंसाचाराच्या घटना वाढणे यासारख्या गंभीर सामाजिक समस्या निर्माण झाल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस नागेश अभिमन्यू चव्हाण यांनी वैराग पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांना निवेदन देऊन या अवैध दारू व गुटखा विक्रीवर तात्काळ बंदी आणून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनात, महाराष्ट्र दारूबंदी कायदा (१९४९) लागू करून परिसरातील गुत्तेविक्री पूर्णतः बंद करण्याची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे. अन्यथा स्थानिक ग्रामस्थ आणि महिला भगिनींना घेऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. निवेदनाची प्रत पोलिस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागालाही पाठविण्यात आली असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीने कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### उपाध्यक्षपदी प्रदीप सातव तर सरचिटणीस पदी संदीप सातव



वाघोली (आरंभ पर्व) : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या पुणे जिल्हा (उत्तर) कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेशाच्या मान्यतेनुसार जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद यांनी ही कार्यकारिणी केली. यामध्ये उपाध्यक्षपदी प्रदीप सातव तर सरचिटणीसपदी संदीप सातव यांची निवड करण्यात आली. या कार्यकारिणीत चार सरचिटणीस, आठ उपाध्यक्ष, आठ सचिव व एक कोषाध्यक्ष अशा ३९ पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. युवा, महिला, व्यावसायिक, शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना प्रतिनिधित्व देत पक्षाने सर्वसमावेशक कार्यकारिणी उभी केली आहे.

# पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्र तपासणी व आरोग्य शिबिर

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा सप्ताहाच्या अनुषंगाने खडकवासला ग्रामीण भाजपा यांच्यावतीने खडकवाडी येथे भव्य नेत्र तपासणी व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

मळाईमाता मंदिर परिसरात भरविण्यात आलेल्या आरोग्य शिबिरात सुमारे 300 नागरिकांची मोफत तपासणी करण्यात आली. यात रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग आदी तपासण्या करण्यात आल्या. तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करून आवश्यक सल्लाही दिला.



नेत्र शिबिरात मोफत डोळ्यांची तपासणी, चष्म्यांचे वाटप तसेच मोतीबिंदू, तिरळेपणा व डोळ्यांतील गाठींच्या शस्त्रक्रिया सिम्बायोसिस युनिव्हर्सिटी हॉस्पिटलमध्ये मोफत करण्यात येणार आहेत. इच्छुकांना आधारकार्ड व रेशनकार्ड या कागदपत्रांची आवश्यकता असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या उपक्रमाचे आयोजन आमदार भीमराव अण्णा तापकीर, पुणे दक्षिण जिल्हा अध्यक्ष शेखर वडणे, युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष वैभव सोलंकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रम भाजपा खडकवासला ग्रामीण अध्यक्ष नवनाथभाऊ तागुंदे, उपाध्यक्ष दत्ताभाऊ पायगुडे, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष परशुराम तागुंदे यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

यावेळी नाना ढमढेरे, तानाजी तागुंदे, आबा ढमढेरे, रोहिदास ढमढेरे, दत्तात्रय तागुंदे, बाळासाहेब कानगुडे, चंद्रकांत कानगुडे, अर्जुन कानगुडे, नारायण तनपुरे, संजय तुपे, सदाशिव तनपुरे, बाळासाहेब काशिनाथ ढमढेरे आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिरामुळे ग्रामस्थांना मोफत आरोग्यसेवा व डोळ्यांच्या उपचाराची सुविधा मिळून समाधान व्यक्त करण्यात आले.






# दत्ताभाऊ कोल्हे : संघर्षातून समाजसेवेत आणि आता जनतेचा प्रबळ आवाज

## वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष

## प्रतिक गंगणे, व्यवस्थापकीय संपादक



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राजकारण म्हणजे केवळ सत्तेसाठी झगडणे नव्हे, तर लोकांच्या प्रश्नांसाठी खंबीरपणे उभे राहणे हे खरे नेतृत्व असते. आज अशा लोकाभिमुख नेतृत्वाची ओळख बनलेले नाव म्हणजे भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे सचिव दत्ताभाऊ कोल्हे.

**शेतकरी कुटुंबातून संघर्षाचा प्रवास :** दत्ताभाऊंचा जन्म एका साध्या शेतकरी कुटुंबात झाला. कष्ट, संघर्ष आणि प्रामाणिकपणावर विश्वास ठेवून त्यांनी आयुष्याचा प्रवास सुरू केला. पोलीस सेवेत असताना समाजाशी थेट संपर्क आला, धैर्य आणि शिस्त अंगीकारली. त्यानंतर व्यवसायातून स्वावलंबन उभारले, पण मनापासून वाटणारे कार्य म्हणजे जनसेवा असल्याने त्यांनी सामाजिक कार्याचा मार्ग निवडला.

**जनतेसाठी सदैव सज्ज :** रस्ते, पाणी, ड्रेनेज यांसारख्या मूलभूत प्रश्नांसाठी आंदोलनं केली.

पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला.

शैक्षणिक मदत, आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे राबवली.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी आणि युवकांच्या संधींसाठी नेहमी आघाडीवर राहिले.

दत्ताभाऊंच्या या उपक्रमांमुळे ते "प्रत्येक नागरिकाचा प्रश्न म्हणजे माझा स्वतःचा प्रश्न" अशी ओळख निर्माण करू शकले.

**सर्वपक्षीय मान्यवरांशी स्नेहभाव :** दत्ताभाऊ कोल्हे हे केवळ एका पक्षापुरते मर्यादित नाहीत. आ. योगेश अण्णा टिळेकर व आ. भीमराव तापकीर यांच्याशी त्यांचे घनिष्ठ, मधुर संबंध आहेत. तसेच सर्वपक्षीय मान्यवरांशी त्यांनी सदैव स्नेहभाव ठेवला आहे. राजकारणात विरोध असतो, पण मनात वैर नसावे या तत्त्वावर ते काम करतात.

**महानगरपालिका निवडणुकीतील दावेदारी :** या सर्व पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक 33 मधून दत्ताभाऊ कोल्हे प्रबळ दावेदार ठरतील अशी जोरदार चर्चा सुरु आहे. जनतेशी असलेले त्यांचे आपुलकीचे नाते, समाजासाठी सातत्याने केलेले कार्य, आणि सर्वपक्षीय मान्यवरांशी असलेला स्नेहभाव यामुळे त्यांच्या उमेदवारीला जनतेचा प्रचंड पाठिंबा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दत्ताभाऊ कोल्हे हे संघर्षातून पुढे आलेले, जनतेसाठी सतत झगडणारे आणि सर्वसामान्य माणसाच्या समस्या स्वतःच्या समस्या मानणारे खरे सेवक आहेत. आज पुणे शहराला हवा आहे – आपला माणूस, खरा कार्यकर्ता, आणि लोकांचा आवाज! आणि तो आवाज म्हणजेच दत्ताभाऊ कोल्हे – प्रभाग 33 मधून जनतेचा प्रबळ दावेदार.



## थोडक्यात पण महत्वाचे



### उमा राय यांची भाजपा खडकवासला मंडळ शिक्षण सेल संयोजकपदी नियुक्ती

पुणे (आरंभ पर्व) : भारतीय जनता पार्टी खडकवासला विधानसभा मतदारसंघ मंडलाच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीत संस्कार फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा व माय मेडपॅथ आणि सूर्यनाथा पॅरामेडिकल नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या सीईओ उमा राय यांची शिक्षण सेल संयोजकपदी नियुक्ती करण्यात आली. ही महत्वपूर्ण जबाबदारी पुणे महानगर अध्यक्ष श्री. धीरजजी घाटे, खडकवासला मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार भीमराव अण्णा तापकीर तसेच दक्षिण मंडल अध्यक्ष रुपेशतात्या घुले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सोपविण्यात आली. नियुक्तीनंतर उमा राय यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, "मिळालेल्या संधीचे सोन करून निश्चितच मेहनत घेणार असून मोदीजींच्या विकसित भारत अभियानात सक्रिय योगदान देणार. विशेषतः शिक्षण क्षेत्रात वंचित व गरीब विद्यार्थ्यांना सहकार्य करणे हेच माझे ध्येय आहे." वरिष्ठ नेते व पदाधिकाऱ्यांनी विश्वास व्यक्त केला आहे की, उमा राय यांच्या सामाजिक व शैक्षणिक अनुभवाचा लाभ भाजपा संघटनाला निश्चितच होईल. या नियुक्तीमुळे खडकवासला मतदारसंघातील भाजपाच्या शिक्षण क्षेत्रातील उपक्रमांना नवे बळ मिळणार आहे.




### सिंहगड रोड सांस्कृतिक, सामाजिक व क्रीडा परिषद या नावावर शिक्कामोर्तब

पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड रोड परिसरातील थिटे बंगल्यात योगा हॉलमध्ये झालेल्या बैठकीत श्री .थिटे यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयांवर चर्चा होऊन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीत संस्थेचे नाव 'सिंहगड रोड सांस्कृतिक, सामाजिक व क्रीडा परिषद' असे निश्चित करण्यात आले. कार्यकारिणी समिती पुढील बैठकीत जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच महिला सदस्यांनी सणासुदीमुळे अनेक सदस्य उपस्थित राहू शकत नसल्याने पुढील बैठक दसऱ्यानंतर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढील बैठकीची तारीख गटामध्ये जाहीर केली जाणार आहे. संस्थेचे लोगो व लेटरहेड लवकरच अंतिम केले जाणार असून कार्यकारिणी निश्चित झाल्यानंतर कार्यालयाचा पत्ताही ठरवला जाणार आहे. शंभर टक्के सभासद नोंदणीसाठी सर्व उपस्थित सदस्यांनी पुढाकार घ्यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. दरम्यान, काही सदस्य बैठकीस उशिरा हजर झाल्याची नोंद करण्यात आली. बैठकीत श्री. प्रभुणे यांना ८ ऑक्टोबर रोजी कॅनडा प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. बैठकीचा समारोप डॉ. रितेश वांगवड यांनी आभारप्रदर्शन करून केला. चहापानाने बैठकीची सांगता झाली.

# निरोगी जीवन जगण्यासाठी आरोग्य तपासणी करणे आवश्यक

## प्रशांत जगताप : नऱ्हेगावात आरोग्य शिबिर व नवदुर्गा सन्मान सोहळा उत्साहात

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

निरोगी जीवन जगण्यासाठी आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी व्यक्त केले.

नऱ्हेगाव माजी सरपंच पोपटराव खेडेकर यांच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.



माजी सरपंच पोपटराव खेडेकर, डॉ . राजेश्वरी ताई पाटील यांनी राबवलेला उपक्रम स्तुत्य असून पक्ष त्यांच्या नेहमी पाठीशी असणार आहे. असे म्हणत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विधानसभा अध्यक्ष काकासाहेब चव्हाण ,ग्रामीण अध्यक्ष त्रिंबक अण्णा मोकाशी, माजी सभापती प्रभावती भूमकर, डॉ. राजेश्वरी ताई पाटील,सुप्रिया भुमकर, सुरेखा पवार आदी मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाऊस सुरू झाल्यानंतरही नागरिकानी सहभाग घेतल्याने शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तपासणीसोबत तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्यविषयक मार्गदर्शनही करण्यात आले.

यावेळी हिरकणी प्रतिष्ठान तर्फे नवदुर्गा सन्मान व आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रतिष्ठानच्या अध्यक्षा राजेश्वरी पाटील यांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करून त्यांना गौरविण्यात आले.

भर पावसामध्ये नऱ्हेगावातील ग्रामस्थांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या उपक्रमातून आरोग्य जनजागृतीबरोबरच समाजातील महिला व शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यामुळे समाजात विधायक संदेश पोहोचल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.

> **आजवर नऱ्हेकरासाठी जनसेवा करण्यासाठी प्रयत्न केले. भविष्यातही त्याच ताकतीने नऱ्हेचा विकास करण्यासाठी निश्चीत प्रयत्न करणार असल्याचे मत माजी सरपंच पोपटराव खेडेकर यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.**

## कोंडी सुटेना, राधा चौकात वाहनांच्या दूरवर रांगा

**औंध (दै. आरंभ पर्व)**

बाणेर-महाळुंगे रस्त्यावरील राधा चौकात दररोज भीषण वाहतूक कोंडी होत असल्याने नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. यावर वाहतूक विभागाकडून अनेक उपाययोजना करूनही परिस्थितीत सुधारणा होत नसल्याने नोकरदारांना कामावर वेळेत पोहोचण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. वाहतूक विभागाने योग्य त्या उपायांची अंमलबजावणी करून वाहनचालकांसह स्थानिक रहिवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. या परिसरात सकाळी आठ ते ११ या गर्दीच्या वेळेत उड्डाण पुलाखालील वळणावर वाहनांच्या लांबलचक रांगा लागत असून, याचा परिणाम थेट डी-मार्टपर्यंत तसेच पश्चिमेला महाळुंगे पोलिस चौकीपर्यंत जाणवतो. कधी कधी येथील एका हॉटेलसमोरील कोंडीचा परिणाम बाणेरकडील हभप सायकर चौकापर्यंत तर महाळुंगेच्या बाजूला क्रीडा संकुलाच्या प्रवेशद्वारापर्यंत जाणवतो.

## नवरात्रोत्सवात तुकाई मंदिरात महिला भाविकांकडून दुर्गा सप्तशती पाठाचा गजर

**किरण खुडे**

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर शहराजवळील प्राचिन तुकाई माता मंदिरात शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त नियमीत दुर्गा सप्तशतीचे सामुहीक पठण करण्यात येते. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने महीला भाविक सहभागी होत आहेत. मार्कंडेय पुराणातील दुर्गा सप्तशती ग्रंथ नवरात्रात विशेष महत्त्वाचा मानला जातो. सकाळ-संध्याकाळ मंदिर परिसरात वाजणाऱ्या घंटानादासह महिला भाविक एकत्र येऊन देवीची आरती, स्तोत्रे आणि सप्तशतीचे



अध्याय पठण करीत आहेत. "या देवी सर्वभूतेषु..." या स्तोत्रपठणाने परिसरात एक भक्तिभावाचे वातावरण निर्माण केले जात आहे. नवरात्रीदरम्यान प्रत्येक दिवसाला देवीचा वेगळा अवतार पूजला जात असल्याने भक्त महिलांचा उत्साह अधिकच वाढला आहे. स्थानिक मंदिर समित्यांच्या वतीने सामूहिक दुर्गा सप्तशती पठणासोबतच विविध देवतांच्या आरत्या, भजने, कीर्तन सप्ताह आणि जागराचा कार्यक्रमही आयोजीत केला जात आहे. अशी माहीती भाविक रमेश रोडे यांनी दिली. भक्तांच्या सामूहिक सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय झाला असून, दररोज सुमारे दोनशे महिला भाविक या दुर्गा सप्तशती पठणासाठी सहभागी होत आहेत. तसेच रात्री व पहाटेच्या आरतीस हजारो भाविकजन उपस्थित राहतात, तर दिवसभरात सुमारे २५ हजार भाविक देवीचे दर्शन घेतात. तसेच ३ ते ४ हजार भाविक महाप्रसादाचा लाभ घेत असल्याचे ट्रस् चे अध्यक्ष शिवाजी कोरडे व लवमेश कोरडे यांनी नवराष्ट्रशी बोलताना सांगितले.

## नवरात्रोत्सवानिमित्त 'वर्दीतील नवदुर्गां'चा सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**


नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून चित्रपट आणि नाट्य संस्था (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही 'वर्दीतील नवदुर्गा' या उपक्रमांतर्गत पुणे शहरातील शिवाजीनगर, डेक्कन, कोथरूड, फरासखाना, खडक, स्वारगेट, चंदननगर, येरवडा व विमाननगर या नऊ पोलीस ठाण्यांमधील कर्तव्यदक्ष महिला पोलिस अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सर्व महिला पोलिस अधिकाऱ्यांना सन्मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा देत मिठाईचे वाटपही करण्यात आले.



या उपक्रमाला संस्थापक अध्यक्ष शुभम शशिकांत मोरे, सचिव अभिनेता चेतन दशरथ गिरी, बालगंधर्व टॅलेंट कट्टा अध्यक्ष निलेंद्र यादव, उपाध्यक्ष अभिनेता कुणाल देशमुख, संचालिका अभिनेत्री रश्मी बांदल, संचालिका अभिनेत्री अनुश्री ढम, आनंदी फाउंडेशनचे गणेश विटकर, सामाजिक कार्यकर्ते रोहित भिसे, दीपक भारती, रंगभूषाकार बालाजी गोरे, अनिल गायकवाड, सुधीर भालेराव, ओमकार जाधव, अनिकेत जगताप, मयूर कांबळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. शुभम मोरे म्हणाले, "आपल्या समाजजीवनात पोलिसांची भूमिका अत्यंत मोलाची आहे.

२४ तास कर्तव्य बजावताना घरातील जबाबदाऱ्या आणि व्यावसायिक आयुष्याचा समतोल राखणाऱ्या महिला पोलिस अधिकारी खऱ्या अर्थाने आधुनिक नवदुर्गा आहेत. त्यांच्या त्याग, धैर्य आणि कर्तृत्वाला सलाम करण्यासाठी हा उपक्रम गेली आठ वर्षे सातत्याने राबविला जात आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून पोलिस दलातील महिलांना एक वेगळी ऊर्जा व प्रेरणा मिळावी, हीच अपेक्षा आहे."











दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.